ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627


# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No 175

वर्ष ३६ | पुणे, बुधवार, १ जुलै, १९७० | अंक १३


# विविधोपयोगिता

किर्लोस्कर पंपांचे हे वैशिष्ट्य होय !




गेल्या अर्ध शतकाहून अधिक काळ आम्ही अनेक प्रकारच्या उपयोगांसाठी विविध प्रकारचे पंप तयार करीत आहो. किर्लोस्कर पंपाच्या प्रत्येक भागांत आमची श्रेष्ठ दर्जाबद्दलची परंपरा आणि उत्पादनाचा दीर्घ अनुभव व आधुनिक तंत्रज्ञान यांचा संयोग झाला आहे.

**विविध प्रकारच्या**
**किर्लोस्कर पंपांची उपयुक्तता**

• शेतीला पाणी पुरवठा • पिकावर पाणी शिंपडण्याच्या योजना • वॉटर वर्क्स • बूस्टर सर्व्हिस
• सीवेज • ड्रेनेज • सँडी वॉटर • स्टॉर्म वॉटर
• फायर फायटिंग • खाणी • रासायनिक, कागद व साखर कारखाने • प्रोसेसिंग प्लँटस् • व्हिस्कस लिक्विडस्
• तेलशुद्धि कारखाने • डेअरीज • डिस्टिलरीज
• खत कारखाने

किर्लोस्कर

**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड**
उद्योग भवन, टिळक रोड, पुणे–२.




STUBA

## उत्पादकतेस पोषक असे संस्कार विद्यार्थीदशेतच घडविले पाहिजेत.

**डॉ. प्र. चिं. शेजवलकर ह्यांचे अध्यक्षीय भाषण**

पुणे विभाग उत्पादकता मंडळाची ११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २२ जून, १९७० रोजी मराठा चेंबरच्या पदमजी हॉलमध्ये भरली होती. त्या वेळी डॉ. प्र. चिं. शेजवलकर ह्यांनी अध्यक्षपदावरून खालीलप्रमाणे भाषण केले :—

"गेले सबंध आर्थिक वर्ष अनेक दृष्टींनी अर्थपूर्ण ठरले. विशेषतः राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या घडामोडी झाल्या. काँग्रेस पक्ष दुभंगल्यामुळे डावीकडे झुकणाऱ्या सत्तारूढ गटाला सामान्य जनतेचे राहणीमान सुधारण्यासाठी काही विशिष्ट धोरण आखावे लागले. हे सर्व धोरण सामाजिकदृष्ट्या जरी औचित्यपूर्ण होते तरी गेल्या वीस वर्षांत बिकट होत गेलेले मूळचे आर्थिक प्रश्न अद्यापिही सुटलेले नाहीत. अन्नधान्याचा आणि गरजेच्या वस्तूंचा तुटवडा, चलनवाढ व तज्जन्य महागाई आणि बेकारी हे तीन प्रश्न खऱ्या अर्थाने सोडवावयाचे असतील तर कोणत्याही सत्तारूढ पक्षाला उत्पादनक्षमतेचे तंत्र सर्व आर्थिक क्षेत्रांत वापरावे लागेल. गेल्या दोन वर्षांत औद्योगिक क्षेत्रात फारच कमी प्रमाणात गुंतवणूक झाली आहे ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे बेकारी अधिक वाढेल, किमती चढतील आणि मालक मजूर संबंध दुरावतील. औद्योगिक खर्च कमी करण्याचा, सर्व प्रकारचे उत्पादन वाढविण्याचा आणि मालक आणि मजूर यांच्यामध्ये सामंजस्य निर्माण होइल अशा तऱ्हेचा उपाय योजण्याचा सर्वंकष प्रयत्न झाला पाहिजे. या दृष्टीने यंदाचे वर्ष "आशियाअी उत्पादनक्षमता वर्ष" म्हणून साजरे केले जाणार आहे, ही स्वागतार्ह गोष्ट आहे. मात्र उत्पादनक्षमता मोहीम केवळ औपचारिक घोषवाक्ये तयार करण्यापुरतीच मर्यादित राहता कामा नये. कामगार शिक्षणयोजनांवर भर द्यावयास हवा. मालाच्या दर्जाची निश्चितता, उत्पादनाला चालना देणारी कररचना, मजबूत कामगार संघटना आणि औद्योगिक क्षेत्रातील सर्वांत कनिष्ठ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण या योजना अधिक परिणामकारक रीतीने कार्यान्वित व्हावयास पाहिजेत. उत्पादनक्षमतेचा संदेश शेवटच्या कामगारापर्यंत पोहोचावयास हवा. माणसे, यंत्रे आणि औद्योगिक कच्चा माल यांचा जास्तीतजास्त चांगल्या रीतीने उपयोग कसा करता येईल याकडे जितके जास्त लक्ष दिले जाईल तितकी उत्पादनक्षमता मोहीम यशस्वी होईल. मात्र यासाठी खरे म्हणजे स्वावलंबन, कार्यक्षमता, काटकसर आणि वक्तशीरपणा या विषयींचे संस्कार विद्यार्थीदशेतच करण्याची योजना पाहिजे."

---


**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २

**महाराष्ट्रातील नामवंत बँक**

शेड्यूल्ड बँक ] [ स्थापना - १९३६

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

सातारा

रजिस्टर्ड ऑफिस : १४३-१४६, भवानी पेठ, सातारा शहर.

आपल्या ४३ शाखांनिशी आपल्या सर्व प्रकारच्या बँकिंगच्या सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात तत्पर.

खेळते भांडवल : १२ कोटींचे वर

ठेवी : ११·७५ कोटींचे वर

ठेवींचे आकर्षक व्याजाचे दर.
तऱ्हेतऱ्हेच्या उद्योगधंद्यांस साहाय्य.
कोणत्याही शाखेस भेटा अगर लिहा.

**वि. श्री. दामले**
बी. ए., एम्. कॉम्., एलएल् बी,
सी. ए. आयुआयू. बी. चेअरमन

☆ अर्थ ☆

बुधवार, १ जुलै, १९७०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांना नफा केव्हा होणार ?

भारत सरकारच्या अर्थ खात्याच्या माहिती विभागाने सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यात १९७०-७१ सालापासून नफा होऊ लागेल असा अंदाज व्यक्त केला आहे. ह्यासंबंधीच्या अहवालात सरकारी मालकीच्या औद्योगिक आणि व्यापारी अशा दोन्ही प्रकारच्या संघटनांचा समावेश करण्यात आला आहे. ३१ मार्च, १९६९ अखेर सरकारी मालकीच्या संघटनांची संख्या ८१ होती आणि त्या सर्वांत मिळून ३,९०० कोटी रुपयांचे भांडवल गुंतविण्यात आलेले होते, त्यांपैकी ७३ कंपन्यांनी १९६८-६९ ह्या साली २७·७ कोटी रुपयांचा तोटा दाखविला होता. १९६९-७० सालात ठोक नफ्याचा आकडा २५ कोटींच्या घरात जाण्याची शक्यता आहे. पुढील वर्षात मात्र उद्योगधंद्यांना नफा होणार नसला तरी तोटा तरी नाही असा अंदाज आहे. सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांची कार्यक्षमता आणि किफायतशीरपणा ह्यांच्यात सुधारणा करण्यासाठी गेल्या दोन वर्षांत अनेक उपायांची योजना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ह्या विभागात नवीन औद्योगिक संघटना उभारताना त्यांचा आर्थिक आराखडा जास्त वास्तववादी दृष्टीने आखण्याची दक्षता घेण्यात येत आहे. सार्वजनिक मालकीच्या कंपन्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि त्यांच्यात सूत्रबद्धता आणण्यासाठी जरूर असणारी लायकी आता माहिती विभागाने मिळविलेली आहे. ह्या विभागात भांडवल गुंतवणुकीचे निर्णय घेण्याची एक नवीन पद्धत घालून देण्यात आली आहे. त्यामुळे व इतर उपायांमुळे ह्या उद्योगधंद्यांना बळकटी प्राप्त होईल.

### तज्ज्ञांचा तुटवडा भरून काढण्याचा प्रयत्न

सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांत वरिष्ठ जागांवर काम करण्यासाठी जरूर असलेल्या तज्ज्ञांचा पुरवठा नीटसा होत नाही. त्यामुळे कारखान्यांपुढे अनेक कठीण प्रश्न उभे राहतात. कारखान्यांमधील कित्येक वरिष्ठ व जबाबदारीच्या जागा लायक माणसांअभावी भरण्यात आलेल्या नाहीत. कारभार सुधारणा मंडळाच्या शिफारसी लक्षात घेऊन सरकारने ह्यासंबंधी काही महत्त्वाचे निर्णय घेतलेले आहेत. तथापि, अजूनही ह्या कारखान्यांतील वरिष्ठ जागांवर सरकारच्या मुलकी खात्यातून उसने दिले गेलेले कित्येक अधिकारी काम करीत आहेत. ह्या अधिकाऱ्यांची वेतनश्रेणी दरमहा २,५०० ते ३,००० रुपये अगर त्यापेक्षाही अधिक अशी आहे. त्यांना उसनवारीची मुदत संपल्यावर मूळच्या जागी रुजू होण्याचा अगर सध्या ते काम करीत असलेल्या कारखान्यातच कायम होण्याचा पर्याय देण्यात आला आहे. ह्या पर्यायाची मुदत आता आणखी एक वर्षाने वाढवून २८ फेब्रुवारी, १९७१ पर्यंत ठेवण्यात आली आहे. ह्यापेक्षा कमी वेतनश्रेणी असलेल्या म्हणजे दरमहा २,५०० ते ३,००० रुपयांपर्यंत पगार असणाऱ्या अधिकाऱ्यांची पर्याय निवडण्याची मुदत २९ फेब्रुवारी, १९७२ पर्यंत वाढविण्यात आली आहे. जे अधिकारी सरकारी मालकीच्या कारखान्यांतून काम करण्याचा पर्याय पसंत करतील त्यांना पूर्वीच्या सरकारी नोकरीच्या नियमांप्रमाणे निवृत्तिवेतन आणि ग्रॅच्युइटीची रक्कम मिळण्याची सवलत देण्यात आली आहे. त्याशिवाय कारखान्यातील त्यांचा पगार चालू राहीलच. त्यांची शिल्लक राहिलेली रजाही त्यांना नव्या नोकरीत मिळू शकेल. प्रॉव्हिडंट फंडाचा फायदाही अर्थातच मिळेल. सार्वजनिक मालकीच्या विभागातील तज्ज्ञांचा तुटवडा भरून काढण्याचा हा प्रयत्न आहे.

---

## पाकिस्तानची आर्थिक धोरणे अयशस्वी आहेत

पाकिस्तान सरकारचे माजी आर्थिक सल्लागार डॉ. कुरेशी ह्यांनी 'पाकिस्तान टाइम्स'मध्ये एक लेख लिहून पाकिस्तानची आर्थिक धोरणे अत्यंत अयशस्वी ठरल्याचे प्रतिपादन केले आहे. ते लेखात म्हणतात की पाकिस्तानची सध्याची आर्थिक-अवस्था पूर्वी कधीही नव्हती इतकी बिघडलेली आहे. आपल्या प्रतिपादनाच्या समर्थनार्थ त्यांनी सरकारने प्रसिद्ध केलेले आकडे सादर केले आहेत. त्या आकड्यांचा आधार घेऊन ते पुढे म्हणतात की लाहोर, कराची, नारायणगंज, ह्यासारख्या मोठ्या शहरांतील राहणीच्या खर्चाचा निर्देशांक गेल्या १० वर्षांत ३० पॉइंटसनी वाढला आहे. ह्याच अवधीत गव्हाच्या किमती ५६ टक्क्यांनी, डाळीच्या किमती १३३ टक्क्यांनी आणि मांसाच्या किंमती १२६ टक्क्यांनी वाढल्या आहेत. मिठाच्या ४८ टक्क्यांनी व जळाऊ लाकडाच्या किमती ९६ टक्क्यांनी वाढल्या आहेत. किमती चढत जाण्याची ही प्रक्रिया १९६४ नंतर सुरू झाली. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या खर्चात एकदम वाढ झाल्याने असे झाले. १९६५ साली भारताशी झालेल्या युद्धामुळे किमतीच्या चढाईला आणखीच गती मिळाली. त्याच वेळी

पाकिस्तानने "तोफा की लोणी" हवे ह्यासंबंधी निर्णय घेण्यास हवा होता. पण दुर्दैवाने तसे झाले नाही. पाकिस्तानने लष्करावरील खर्च आणि सुखसमृद्धीसाठी लागणारा खर्च एकाच वेळी करण्यास प्रारंभ केला. परिणाम असा झाला की चलनवृद्धीची तार मोकळेपणाने खेचली गेली; आणि महागाई भडकत चालली. पाकिस्तानचा तिसरा पंचवार्षिक कार्यक्रमही भौतिक व वित्तविषयक उद्दिष्टांच्या दृष्टीने अव्यवहार्य आहे. कारण, परदेशांकडून मिळावयाच्या आर्थिक साह्याच्या खोट्या आशांवर तो आधारलेला आहे. त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था आर्थिक अरिष्टाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

---

## १४ पैकी ८ बँक-कस्टोडिअन्सचा पगार रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरापेक्षा अधिक आहे.

सरकारी मालकीच्या कंपन्यांच्या चालकांना आय. सी. एस. सेक्रेटरीच्या पगारापेक्षा (महिना ४,००० रु.) जास्त पगार मिळत नाही, परंतु राष्ट्रीयीकृत बँकांचे कस्टोडिअन्स सरकारचे सर्वात जास्त वेतन घेणारे नोकर बनले आहेत. त्यात पंजाब नॅशनल बँकेचे श्री. त्रिखा ह्यांचा पगार सर्वात जास्त म्हणजे ६,००० रु. आहे. चार इतर कस्टोडिअन्सनाही एवढा पगार मिळतो, परंतु श्री. त्रिखा ह्यांना अन्य मार्गे जास्त मोबदला मिळतो. बहुतेक कस्टोडिअन्सचे घरभाडे बँक देते; मोटारखर्च बँक करते; त्यांना दरमहा चहापाणी करण्यासाठी अलाउन्स मिळतो. त्याची रकम दरमहा २०० ते ५०० रु. असते. पण पंजाब नॅशनल बँक कस्टोडिअनने केलेला सर्व खर्च बँक सोसते. सर्वात कमी पगार (३,५०० रु.) सिंडिकेट बँकेच्या कस्टोडिअनला आहे. बँक ऑफ महाराष्ट्राच्या कस्टोडिअनला ३,७०० रु. मिळतात. इंडियन बँक, इंडियन ओव्हरसीज बँक व कॅनरा बँक ह्यांच्या कस्टोडिअन्सचा पगार ४,००० रु. आहे. अलाहाबाद बँकेच्या कस्टोडिअनला ४,५०० रु. म्हणजे रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नराइतका पगार मिळतो. देना बँक, युनियन बँक आणि युनायटेड बँक ह्यांच्या कस्टोडिअन्सचा पगार ५,००० रु. आहे. युनायटेड कमर्शिअल बँक, सेंट्रल बँक, बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ बरोडा, ह्या सर्वांचे कस्टोडिअन प्रत्येकी दरमहा ६,००० रु. घेतात. अशा रीतीने, १४ पैकी ८ कस्टोडिअन्सचा पगार रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरापेक्षा, म्हणजे त्यांच्या वरिष्ठापेक्षा, जास्त आहे. ही परिस्थिती काही काळ अशीच टिकणार आहे, कारण कायद्याप्रमाणे नवीन संचालक मंडळ आणि कस्टोडिअन्स ह्यांना राष्ट्रीयीकरणाच्या पूर्वीचेच वेतन मिळावयाचे आहे. नवीन नेमणुका करतेवेळी त्यात सरकारला बदल करता येईल.

---

## राष्ट्रीयीकृत बँकांनी कारखान्यांशी विलीन व्हावे.

राष्ट्रीयीकृत बँकांना नुकसानभरपाईदाखल ८७·४ कोटी रु. मिळाले, त्या मोठ्या रकमेचा उत्तम विनियोग केला जाणे अगत्याचे आहे. त्या संबंधात श्री. पालखीवाला ह्यांनी व्यक्त केलेले विचार लक्षात घेण्याजोगे आहेत. एखाद्या चांगल्या कारखान्याशी ह्या बँकांनी विलीनीकरण करावे, म्हणजे त्यांच्या भागधारकांवर कराचा बोजा बसणार नाही, इतकेच नव्हे तर मुद्दलातही वाढ होईल; जमा झालेले भांडवल आयतेच औद्योगिक प्रगतीस उपयोगी पडेल, असे श्री. पालखीवाला ह्यांचे म्हणणे आहे. ह्या बँक कंपन्या लिक्विडेशनमध्ये नेल्या, तर हजारो भागधारकांना कॅपिटल गेन्स टॅक्स, डिव्हिडंडवरील कर, इत्यादी बाबतीत बराच कोर्टदरबार करावा लागेल. विमान वाहतूक कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण झाले, त्याला १७ वर्षे झाली तरी अद्याप इनकम टॅक्स खात्याचे आक्षेप संपलेले नाहीत. त्यापेक्षा बँकिंग कंपन्यांनी स्वतः इतर धंदा करावा किंवा चांगल्या कारखान्यांशी विलीन व्हावे. त्यामुळे आपले भाग विकून भागधारकांना आपल्या गुंतवणुकीचे केव्हा तरी रोखीत रूपांतर करता येईल.

---

## शहरांतील लोकसंख्येची स्फोटक शक्ती

अमेरिकेच्या ओव्हरसीज डेव्हलपमेंट कौन्सिलचे प्रमुख मि. लेस्टर ब्राउन ह्यांनी विकसनशील देशातील शहरांच्या वाढत्या लोकसंख्येबद्दल धोक्याचा इशारा दिला आहे. ह्या देशांनी शहराकडे धाव घेणाऱ्या लोकांचा लोंढा कमी होण्यासाठी उपाय योजावेत आणि हे साध्य करण्यासाठी ग्रामीण भागात रोजगारी उपलब्ध करून द्यावी अशी सूचना त्यांनी केली आहे. भारतात होऊ घातलेल्या हरित क्रांतीचा उल्लेख करून ह्या क्रांतीचा नीट उपयोग करून घेतला तर ग्रामीण भागातील लोकांची शहराकडे धाव घेण्याची वृत्ती बदलता येईल असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला आहे. कलकत्ता शहराचा दाखला ह्या बाबतीत त्यांनी दिला आहे. कलकत्त्यात ७० टक्के कुटुंबे एका खोलीत अगर त्याहीपेक्षा कमी जागेत राहात आहेत. त्याचा निर्देश करून, लोकांची बंडखोर वृत्ती अज्ञाने वाढेल असा इशारा त्यांनी दिला आहे.

---

## राजगोपालाचारी ह्यांची कडक टीका

सी. राजगोपालाचारी ह्यांनी 'स्वराज्य' नियतकालिकात एक लेख लिहून भारत सरकारच्या आर्थिक धोरणावर कडक टीका केली आहे. लेखात ते म्हणतात की चौथ्या पंचवार्षिक योजनेसाठी भारताला परदेशांकडून जी मदत मिळणार आहे त्यापैकी निम्म्यापेक्षाही अधिक रकम पूर्वीच्या आंतरराष्ट्रीय कर्जावरील व्याज देण्यात खर्ची पडणार आहे. चुकीची औद्योगिक धोरणे, परदेशांकडून घेतलेली बेलगाम कर्जे आणि सरकारी मालकीच्या औद्योगिक संघटनांचा निष्काळजीपणाचा कारभार, ह्यांचा हा परिणाम आहे. त्यामुळे भारताला कायम कर्जबाजारीच राहावयाचे आहे असा इतर देशांचा ग्रह होईल. परदेशांकडून काढलेल्या कर्जामुळे भारतामधील कोट्यवधी लोक कम्युनिझमकडे झुकण्याचे थांबणार नाहीत.

---

स्वास्तिक

# स्वास्तिक रबर प्रॉडक्टस् लि. चे चेअरमन

## श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांचें अध्यक्षीय भाषण

कंपनी वृत्त

[ स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि. च्या दिनांक २७ जून, १९७० रोजी झालेल्या २२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी संचालक मंडळाचे अध्यक्ष श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांनी केलेले भाषण. ]

आपल्या कंपनीच्या या २२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस आपणा सर्वांचे अगत्यपूर्वक स्वागत करण्यास मला विशेष आनंद वाटत आहे.

१९६९ वर्ष अखेरीचा संचालक मंडळाचा अहवाल व हिशोबाची पत्रके आपणा सर्वांमध्ये प्रसारित केली आहेतच. आपणा सर्वांनी ती वाचून तत्संबंधीची माहिती करून घेतली आहे असे मी आपल्या परवानगीने गृहीत धरतो.

सर्वसाधारण विक्री क्षेत्रात १९६९ मध्ये ४३७ लाख रुपयांवरून ( १९६८ मधील ) ५१० लाख रुपयांपर्यन्त मजल गाठली गेली. त्याचप्रमाणे निर्यात क्षेत्रात १९६९ मध्ये ७०·१३ लाख रुपयांवरून ( १९६८ मधील ) ८१·८४ लाख रुपयांपर्यन्त वाढ झाली. अशा प्रकारे कंपनीच्या प्रगतीच्या वाटचालीला आता समाधानकारक स्थैर्य प्राप्त झाले आहे.



कंपनीचे अध्यक्ष
शंतनुराव किर्लोस्कर

विशिष्ट अपेक्षित प्रमाणात जरी नाही तरी प्रतिकूल परिस्थितीचा विचार करता १९६९ मध्ये आपल्या कंपनीने साध्य केलेले यश हे अत्यंत स्पृहणीय असेच आहे, हे मला आपल्याला आवर्जून सांगावेसे वाटते. या यशप्राप्तीसाठी आपल्या कंपनीला गेले वर्षभर अनेक अडीअडचणींना निकराने तोंड द्यावे लागले. म्हणून गतकालातील एकूण प्रगतीशी, १९६९ मधील कार्याची तुलना करता ते कमी परिणामकारक वाटते.

गेल्या वर्षीच्या माझ्या अध्यक्षीय भाषणात चिंचवड येथे कार्यान्वित असलेल्या कंपनीच्या पादत्राण विभागाच्या स्थापनेबाबत मी उल्लेख केला होता. या पादत्राण विभागाच्या कार्यक्षेत्रात गेले वर्षभर अनेक तांत्रिक अडचणींना व व्यावहारिक समस्यांना आम्ही तोंड दिले व त्यावर मात करून विभागाच्या विस्तारयोजनेत अधिक एकसूत्रता आणली. ही एकसूत्रता आणीत असताना आपल्या कंपनीच्या मालाचा दर्जा व गुणवत्ता कटाक्षाने सर्वोत्कृष्ट ठेवण्यावर कंपनीने विशेष भर दिला. हे करीत असता नफ्याच्या प्रमाणात साहजिकच घट आली. पादत्राणांच्या विक्रीचे अनुष्ठान संघटित करण्यासाठी किरकोळ विक्रीकेंद्रांवर मोठ्या प्रमाणावर खर्च करणे भाग पडले परंतु हा झालेला खर्च ही एक भविष्यकाळतील दीर्घ मुदतीची किफायतशीर गुंतवणूक आहे, हे विसरून चालणार नाही. बाजारा मालास येणारी मागणी आजमावण्याचे महत्त्वाचे कार्यही किरकोळ विक्री केंद्रे करीत असतात. मालाचा दर्जा व विविध प्रकार यांबाबत ग्राहकांच्या आवडीनिवडीची यथार्थ कल्पना उत्पादकांस आजमावता येते. त्या दृष्टीने किरकोळ विक्री केंद्रे उत्पादनास साहाय्य करीत असतात.

१९६१ च्या प्राप्तिकर कायद्यातील नव्या नियमांनुसार घसाऱ्यासाठी लागणाऱ्या तरतुदींमध्ये वाढ करावी लागली. याचाही परिणाम नफ्याचे प्रमाणात घट होण्यात झाला.

नैसर्गिक रबर व रसायने यांसारख्या कच्च्या मालाचा पुरवठा आंतरराष्ट्रीय बाजारातील प्रचलित किमतींनी आज देशात होत नसल्याने निर्यात-उत्पादन क्षेत्रात निर्माण झालेली परिस्थिती गेली दोन वर्षे मी आपल्यापुढे मांडीत आहे. प्रगतिशील आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये आपल्या कंपनीने आपल्या मालाला प्रशंसात्मक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. असे असले तरी आपल्या मालाला या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये किमतीच्या बाबतीत अतिशय तीव्र स्पर्धेस आज तोंड द्यावे लागत आहे. या परिस्थितीचा विचार करता देशातच उपलब्ध होणाऱ्या कच्च्या मालाच्या अवास्तव किमतींमुळे निर्माण झालेल्या विशेष समस्यांचे सरकारने सम्यक् समालोचन करून त्यांचे त्वरित निर्मूलन करणे जरूर आहे असे मला वाटते. हे करीत असताना एक तर महत्त्वाच्या कच्च्या मालाचा पुरवठा आंतरराष्ट्रीय बाजारात प्रचलित किमतींनी देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर निर्यातीमुळे होणारा पुष्कळसा तोटा भरून काढण्यासाठी अशा वस्तूंच्या निर्यातीवर रोख आर्थिक उत्तेजन देणे जरूर आहे. या दोन प्रकारे साहाय्य मिळाल्यास मला असा विश्वास आहे की, येत्या वर्षात आपली कंपनी निर्यात-क्षेत्रात एक कोटी रुपयांहून अधिक विक्री करू शकेल. पाश्चिमात्य राष्ट्रांमधून आपल्या मालाच्या

खरेदीसाठी एवढी मागणी आज आपल्याकडे आलेलीही आहे. मध्यवर्ती सरकारने रबर वस्तू कारखानदारांच्या मूलभूत गरजांचा काळजीपूर्वक विचार करून वास्तव दृष्टिकोणातून परिस्थिती हाताळणे आवश्यक आहे. नोकरशाही पद्धतीने घेण्यात येणारे निर्णय व त्यामुळे होणारे विलंब हे निर्यात उत्पादनात सतत घट आणीत असतात. निर्यातीसाठी आवश्यक असणारी प्रयत्नशीलता, धाडस व कल्पकता यांच्या विकासास या विलंबामुळे बाध येतो.

चालू वर्षात आपल्या कंपनीने अंगीकारिलेल्या विस्तार योजनांकडे मी आता आपले लक्ष वेधू इच्छितो. नाशिक येथे पी. व्ही. सी. पादत्राणांच्या उत्पादनासाठी नवीन कारखाना सुरू करण्याची महत्त्वाची योजना आज आपल्यापुढे आहे. स्टेट इंडस्ट्रियल ॲन्ड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि. तर्फे उद्योगधंद्यांच्या विकेंद्रीकरणासाठी उत्तेजन देण्यात येणाऱ्या "न्यू पॅकेज स्कीम ऑफ इन्सेन्टिव्हज्" या योजनेखाली हा कारखाना सुरू होत आहे. या योजनेतील विक्रीकर परतीच्या सवलतीचा फायदा आपल्या कंपनीला घेता येईल. विक्रीकराची रकम ही दीर्घ मुदतीच्या व्याजरहित व बोजारहित कर्जाच्या स्वरूपात उपलब्ध होईल. हे कर्ज १८ वर्षांनंतर सहा, सहामाही हप्त्यांच्या परतफेडीच्या अटीवर मिळणार आहे. अशा प्रकारे महाराष्ट्र राज्याच्या समतोल आर्थिक विकासामध्ये आपली कंपनी सहभागी होईल. "आय्. सी. आय्. सी. आय्." तर्फे "एक्स्चेंज लोन" व "सिकॉम" तर्फे नाशिक येथील मालमत्तेच्या तारणावर दीर्घ मुदतीचे कर्ज यांमधून सर्वस्वी नाशिक कारखान्याची स्थापना करण्यात येणार आहे. आपल्या कंपनीच्या सध्याच्या कारखान्यावर आर्थिक ताण न येता उपलब्ध असलेल्या साधनांमध्ये मेळ घालून नाशिक कारखान्याची उभारणी होत आहे. "आय्. एफ्. सी." व "आय्. सी. आय्. सी. आय्" यांच्या पूर्वानुमतीने ५० लाख रुपयांचे कर्जरोखे लवकरच विक्रीस काढण्याची आपल्या कंपनीची योजना आहे. मला सांगावयास आनंद वाटतो की, आपल्या कंपनीच्या सहकार्याने स्थापन झालेल्या मेसर्स आय्. जी. एम्. प्रायव्हेट लि. या मॉरिशिअसमधील कंपनीत २६ टक्के समान भांडवल गुंतवणूक करून आपली कंपनी भाग घेत आहे. विविध प्रकारच्या रबर-वस्तूंची निर्मिती येथे केली जाईल.

मला सांगावयास आनंद वाटतो की, मध्यवर्ती सरकारने आपली कंपनी व इंग्लंडमधील मेसर्स ब्युफोर्ट (एअर-सी) इक्विपमेंट लि. यांमधील उत्पादन सहकार्य करारास मान्यता दिली आहे. या कराराद्वारे आपली कंपनी आता हाय अल्टीट्यूड सूट्स, लाईफ जॅकेट्स व व लाईफ रॅफ्ट्स वस्तूंच्या उत्पादनास प्रारंभ करील. या उत्पादनामुळे आपला देश परदेशी हुंडणावळीची फार मोठी बचत करू शकेल. कारण आजपर्यंत देशाला हे साहित्य सर्वस्वी परदेशांतून आयात करावे लागत असे.

नोव्हेंबर १९६९ मध्ये आपल्या कंपनीने २५ लाख रुपयांचे शेअर्स विक्रीस काढले होते. उल्लेख करण्यास आनंद वाटतो की, सव भागधारकांकडून या शेअर्सना प्रचंड पाठिंबा मिळून शेअर्सची विक्री पूर्ण झाली. मोठ्या तयारीनिशी मोठ्या कार्यक्षेत्रात प्रवेश करण्यासाठी आपली कंपनी आता सुसज्ज आहे. गतकाळात अत्यंत अडीअडचणींमध्येही कंपनीच्या कार्यात आपण आपला सक्रिय पाठिंबा दिला आहे व आपल्या सदिच्छा वेळोवेळी व्यक्त केल्या आहेत. याचे प्रतीक म्हणून समान भांडवलावर गतवर्षीइतकाच म्हणजे १२ टक्के लाभांश देण्याची शिफारस सचालक मंडळाने केली आहे. सव अडीअडचणी थोड्याच काळात यशस्वी रीत्या सोडवून आपण आपल्या कंपनीच्या वाढत्या अभ्युदयात भागीदार व्हाल, असा मला विश्वास वाटतो.

श्री. व. श्री. वैद्य व श्री. प. श्री. वैद्य यांनी आपले व्यवस्थापकीय कौशल्य, कर्तृत्वशक्ती, चिकाटी व निष्ठा या गुणांवर आपल्या कंपनीच्या सेवेसाठी जे श्रम घेतले त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक अभिनंदन करण्यात आपण सर्वजण सहभागी व्हाल असा मला विश्वास आहे. कंपनीचे पदाधिकारी, त्यांचे साहाय्यक व कामगार यांनी केलेले कार्य स्तुत्य असेच आहे. त्याचप्रमाणे आपणा सर्वांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन याबद्दल मी आपणा सर्वांचा अत्यंत कृतज्ञ आहे.

अखेरीस संचालक मंडळातील माझे सहकारी यांनी कंपनीच्या प्रगतीत साहाय्य दिले, याबद्दल मी व्यक्तिशः व आपणा सर्वांच्या वतीने त्यांचे आभार मानतो.

## पाकिस्तानी रुपयाच्या अवमूल्यनाचा सल्ला

पाकिस्तानी रुपयाचे अवमूल्यन करण्याचा सल्ला तेथील एका आर्थिक समितीने दिला आहे. ह्या समितीत पाकिस्तानच्या स्टेट बँकेचे डेप्युटी गव्हर्नर आणि पूर्व व पश्चिम पाकिस्तान ह्यातील अर्थशास्त्रज्ञांचा समावेश आहे. १९५५ सालापासून १ डॉलरला ४·७६ पाकिस्तानी रुपये असा दर ठरवून दिला आहे. पण प्रत्यक्षात, बाहेरील बाजारात, सप्टेंबर १९६९ पासून, त्याची किंमत घसरून एका डॉलरसाठी १०·५० पाकिस्तानी रुपये द्यावे लागत आहेत.

## थायलंडला ८·६ कोटी नाणी पाडून देण्याचे कंत्राट

थायलंडला ८·६ कोटी नाणी पाडून देण्याचे कंत्राट मुंबई येथील सरकारी टांकसाळीला मिळाले आहे. ह्या नाण्यात ७५% तांबे व २५% निकेल असेल. भारत, ग्रेटब्रिटन, ऑस्ट्रेलिया, प. जर्मनी, फिनलंड, इत्यादी देशांकडून थायलंडने टेंडर्स मागविली होती.

## दिल्लीमधील शेकडो सहकारी संस्थांची नादारी

दिल्ली शहरातील शेकडो सहकारी संस्था नादार ठरल्या असून इतरही अनेक संस्था त्याच मार्गावर आहेत. त्यामुळे कित्येक कोटी रुपयांचे भांडवल बुडित खाती लिहून टाकावे लागणार आहे. सध्या ६०० सहकारी संस्थांचे कारभार गुंडाळण्याचे काम चालू आहे. सुमारे ६३ संस्थांचा थांगपत्ताच लागत नसल्याने दिल्ली शासनाचे ३.१७ लाख रुपये आणि दिल्ली स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे ३३ लाख रुपये बुडल्यातच जमा आहेत. ह्या ६३ संस्था भारताची फाळणी झाल्यावर दिल्लीच्या सहकारी खात्याने निर्वासितांचे पुनर्वसन करण्यासाठी स्थापन केल्या होत्या. पुढील काळात निर्वासितांची भारताच्या निरनिराळ्या भागात सोय लावण्यात आली. परंतु त्यांचे पत्ते मात्र खात्याजवळ नाहीत. त्यामुळे खात्याला संस्थांच्या सभासदांकडून थकबाक्या वसूल करण्यासाठी कायदेशीर कारवाई करता येत नाही. थकबाक्या वसूल करून संस्थांचे कार्य चालू ठेवण्यास कायद्याच्या तरतुदी अपुऱ्या ठरत आहेत. दिल्ली शासनाने १९२५ च्या बॉबे कोऑपरेटिव्ह ॲक्टप्रमाणे कारभार चालविलेला आहे. परंतु हा कायदा त्या वेळच्या मुंबई सरकारने अतिशय भिन्न परिस्थितीत मंजूर केलेला आहे. त्या वेळी सहकारी संस्थांची मूळ कल्पनाच ग्रामीण भाग नजरेपुढे ठेवून तयार करण्यात आलेली होती. सहकारी संस्थांचे कार्य अर्थातच खेड्यापुरते मर्यादित ठेवण्यात आलेले होते. महाराष्ट्र राज्याने नवीन परिस्थिती आणि सध्याच्या सहकारी संस्थांचे विस्तृत कार्यक्षेत्र लक्षात घेऊन कायद्यात योग्य त्या दुरुस्त्या करून घेतलेल्या आहेत. दिल्लीमधील सहकारी कायदा मात्र अजून तसाच जुनापुराणा राहिलेला आहे.

---

## पाकिस्तानला गव्हाची फुकट मदत पाहिजे

पूर्व पाकिस्तानातील उत्तरेकडील जिल्ह्यांत धान्याची टंचाई तीव्रतेने भासत आहे. हजारो लोकांना वेळीच अन्नधान्य न मिळाले तर उपासमार होण्याची शक्यता आहे. ह्या परिस्थितीस तोंड देण्यासाठी पाकिस्तान सरकारने अमेरिका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिआ ह्या देशांकडून १ लाख टन गव्हाची देणगी मागितली आहे. ह्या देशांनी पाकिस्तानची मागणी मान्य केल्यास तत्क्षणी धान्याच्या वाहतुकीची तयारी ठेवण्यात आली आ . पाकिस्तानने अमेरिकेकडून १७ लाख टन गहू ह्या पूर्वीच आयात केलेला आहे. पूर्व पाकिस्तानच्या लोकांचे मुख्य अन्न तांदूळ आहे. परंतु पुरेसा तांदूळ आयात करणे शक्य नसल्याने लोकांना गहूच खावा लागत आहे. पाकिस्तानने चीनशी ऐनजिनसी अदलाबदलीचा एक करार करून १ लाख टन तांदूळ आयात करण्याची व्यवस्था केली आहे.

---


महाराष्ट्रातील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था

**डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स**

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे.

*संस्थापक—कै. प्रा. ग. कृ. भोपटकर : स्थापना १९१८ : टेलिफोन नंबर ५४१६०*

नवीन वर्षासाठी सोमवार, दि. २२ जून, १९७० पासून स्वतःच्या नवीन भव्य इमारतीत वर्ग सुरू झाले.

— महत्त्वाचे अभ्यासक्रम —

(१) गव्हर्नमेन्ट कमर्शिअल डिप्लोमा कोर्स (जी. सी. डी.) : मुदत : १ वर्ष, किमान पात्रता : एस्. एस्. सी.
वेळा : सकाळ, दुपार किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी. विद्यार्थिनींसाठी फक्त सकाळच्या वेळेत स्वतंत्र वर्ग.

(२) प्री-डिग्री कॉमर्स एक्स्टर्नल परीक्षा : किमान पात्रता : इंग्रजी आणि गणित किंवा अंकगणित घेऊन एस्. एस्. सी.
वेळा : सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी.

(३) प्री-डिग्री आर्टस् एक्स्टर्नल परीक्षा : किमान पात्रता : इंग्रजी घेऊन एस्. एस्. सी.
वेळा : सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी.

— इतर अभ्यासक्रम —

बी. कॉम्. पार्ट वन् व पार्ट टू एक्स्टर्नल परीक्षा, स्पेशल बी. कॉम्. एक्स्टर्नल परीक्षा, डी. कॉम्, कंपनी सेक्रेटरी, कॉस्टिंग, इंग्रजी-मराठी टाइपरायटिंग, इंग्रजी शॉर्टहॅन्ड, बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

प्रसिद्धि-पत्रक : ५० पैसे

अ. ग. भोपटकर
एम्. कॉम्., एलएल्. बी.
प्राचार्य

## आयुर्वेदीय औषधी व्यवसायाची कुचंबणा

सातारा येथील आयुर्वेदीय अर्कशाला लि. ह्या सर्वस्वी आयुर्वेदीय औषधे निर्माण करणाऱ्या कंपनीच्या १८ व्या वार्षिक सभेतील अध्यक्ष श्री. रा. ना. गोडबोले ह्यांचे भाषण.

"देशात स्वातंत्र्योत्तर काळात खाजगी व सरकारी क्षेत्रांत अ‍ॅलोपॅथिक औषधी धंद्याची प्रचंड वाढ झाली, त्यात देशी व परदेशी भांडवल कित्येक कोटींनी गुंतविले गेले; पण देशी औषधांचा धंदा मात्र कसाबसा जीव धरून आहे. आयुर्वेदीय औषधे निर्माण करणाऱ्या अनेक कंपन्या अलीकडे अ‍ॅलोपॅथिक औषधांच्या उत्पादनाकडे वळल्या आहेत. पण आयुर्वेदीय अर्कशाला ही सर्वस्वी आयुर्वेदीय औषधे निर्माण करते. सरकारचे धोरण आयुर्वेदीय शिक्षणाविषयी उत्तेजनाचे असले तरी आयुर्वेदीय औषधी व्यवसायाला सरकारी धोरण तितकेसे अनुकूल नसून नवनवे निर्बंध आणि कर मात्र लादले जात आहेत. या धंद्याबद्दल सरकारने उपेक्षेचीच वृत्ती चालू ठेविली आहे. सरकार आयुर्वेदाला उत्तेजन देत आहे याचा अर्थ ते या औषधी धंद्यालाही उत्तेजन देत आहे असा केला जातो, तो सर्वस्वी चुकीचा आहे. कच्च्या मालाचे भाव नियंत्रित ठेवणे, परदेशातून येणारा माल नियंत्रित दराने उपलब्ध करून देणे, अशा बाबतीत सरकारने मदत करणे आवश्यक आहे. आसवारिष्टे यांना मादक पदार्थ समजून त्यांच्या निर्मितीवर व वाहतुकीवर अनेक जाचक निर्बंध काही राज्य सरकारांनी घातले आहेत. या औषधीविषयी गैरसमज अनेक प्रयत्न करूनही दूर झालला नाही. द्राक्षासव, द्राक्षारिष्ट-सारख्या उपयुक्त औषधांवर (दारूबंदी बाबतचे धोरण शिथील करूनही) बॉंडेड वेअरहौसमध्येच ह्या औषधांची [illegible]ती करण्याचे सरकारी धोरण अद्याप चालू आहे."

---

## राष्ट्रीयीकृत १४ बँकांसाठी नवे ५६ डायरेक्टर

राष्ट्रीयीकृत १४ बँकांच्या बोर्डाच्या डायरेक्टर पदी नेमणुकीसाठी ५६ नावे तयार आहेत. प्रत्येक बँकेला सात डायरेक्टर असतील. परंतु, प्रत्येकी फक्त नव्या चौघांचीच नेमणूक केली आहे. कारण, आज प्रत्येक बँकेचा वेगळा कस्टोडिअन आहे आणि रिझर्व्ह बँकेचा व अर्थखात्याचा प्रतिनिधी प्रत्येक बँकेच्या अंतर्गत व्यवस्थापन समितीवर आहे. ह्या तिघांना डायरेक्टर म्हणून बढती मिळेल. सध्याचे कस्टोडिअन मूळ बँकेतच राहतील का त्यांची इतर बँकेत बदली होईल, हे अजून बाहेर आलेले नाही. सध्या प्रत्येक बँकेसाठी अंतर्गत व्यवस्थापन समिती आहे, तिच्या इतर सभासदांपैकी काहीजणांचा वरील ५६ जणांच्या यादीत समावेश असण्याची शक्यता आहे.

---

## अमेरिकन पीस कोअरबद्दल नाराजी

प्रेसिडेंट केनेडींच्या अमदानीत सुरू झालेली अमेरिकेच्या पीस कोअरची योजना फार वर्षे टिकण्याचा संभव दिसत नाही. पीस कोअरमध्ये दाखल होण्यासाठी १९६४ मध्ये ४५,६५३ अमेरिकन तरुणांनी अर्ज केले होते; त्यांची संख्या आता त्याच्या एक तृतीयांशावर उतरली आहे. अमेरिकेचा पगडा इतर देशांना आवडेनासा झाला आहे. कित्येक आफ्रिकन देशांनी अमेरिकन पीस कोअरच्या स्वयंसेवकांना गाशा गुंडाळण्यास सांगितले आहे. परदेशी पाठविण्यात येणाऱ्या अमेरिकन स्वयंसेवकांचा दर्जा घटला आहे, अशीही तक्रार आहे.

---

## अजमीरमधील अंड्यांचे उत्पादन

अजमीर शहरात अंड्यांच्या उत्पादनाला उत्तेजन देण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. तो चांगलाच यशस्वी झाला आहे. देशातील १० मोठ्या उत्पादनकेंद्रांपैकी ते एक गणले जाते. अजमीरमधील केंद्रातून रोज ५० हजार अंड्यांचे उत्पादन होते. तेथून रोज ४० हजार अंडी दिल्ली, आग्रा, अहमदाबाद, भोपाळ, जयपूर, इत्यादी शहरांना निर्यात करण्यात येतात.

---

### भारतातील व्यापारी बँका

| | १९५१ | १९५६ | १९६१ | १९६६ | १९६८ |
|---|---|---|---|---|---|
| हिंदी शेड्यूल्ड व्यापारी बँका | ७६ | ७२ | ६७ | ६१ | ५८ |
| विदेशी बँका | १६ | १७ | १५ | १५ | १५ |
| बिगर शेड्यूल्ड व्यापारी बँका | ४७४ | ३३४ | २१० | २७ | १७ |
| एकूण व्यापारी बँका | ५६६ | ४२३ | २९२ | १०३ | ९० |

### शेड्यूल्ड आणि बिगर शेड्यूल्ड व्यापारी बँकांच्या कचेऱ्या

| | १९५१ | १९५६ | १९६१ | १९६६ | १९६८ |
|---|---|---|---|---|---|
| स्टेट बँक व उपबँका | ६४३ | ८५० | १,४३६ | २,०७६ | २,३७९ |
| इतर शेड्यूल्ड व्यापारी बँका | २,००४ | २,११६ | २,९५४ | ४,३४० | ५,१०४ |
| बिगर शेड्यूल्ड व्यापारी बँका | १,५०४ | १,१०१ | ६२२ | २२१ | २०७ |
| एकूण व्यापारी बँका | ४,०५१ | ४,०६७ | ५,०१२ | ६,६३७ | ७,६९० |

### वसूल भांडवल, कॅश, कर्जे, रोख्यांत गुंतवणूक, ह्यांचे एकूण ठेवींशी प्रमाण%

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वसूल भांडवल व रिझर्व्ह | ८.७ | ७.८ | ४.८ | ३.७ | २.८ |
| रोख आणि रिझर्व्ह | ११.२ | ८.६ | ६.७ | ५.८ | ६.३ |
| येणे कर्जे | ६१.८ | ७१.६ | ७५.६ | ७७.६ | ७८.३ |
| सरकारी रोख्यात गुंतवणूक | ३७.८ | ३६.४ | ३२.० | २७.५ | २४.३ |

---

### निसर्गाच्या नियमांना राजकीय तत्त्वज्ञानाचे वावडे

हवा, पाणी, जमीन, जंगले, इत्यादी नैसर्गिक साधनसंपत्तीची नासाडी करण्यात अमेरिकेचा इतर अनेक बाबींप्रमाणे पहिला क्रमांक लागतो. अमेरिकेच्या औद्योगीकरणाने कळस गाठला असल्याने तेथील नासाडी वेगाने होत आहे. रशियातील औद्योगिक क्रांती कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाच्या झेंड्याखाली झाली असली तरी तेथेही आता दूषित पाणी, विषारी हवा, शहरांतील कारखान्यातून बाहेर पडलेली घाण, ह्या बाबींनी गंभीर स्वरूप धारण करण्यास प्रारंभ केला आहे. रशियाचे क्षेत्रफळ जगाच्या भूपृष्ठाच्या एक शष्ठांश इतके मोठे आहे. त्यामुळे दूषित नैसर्गिक साधनाचा प्रश्न तेथे अमेरिकेइतका विकट झालेला नाही इतकेच; रशियातील नद्या आणि सरोवरे आता पहिल्याप्रमाणे शुद्ध पाण्याची राहिलेली नाहीत. कॅस्पिअन समुद्र तेलाच्या कारखान्यांनी विषमय होत चालला आहे. रशियाचे धान्याचे कोठार म्हणून प्रसिद्ध असलेल्या युक्रेनमध्ये शेतीसाठी उपयोगी पडणाऱ्या गोड्या पाण्याची टंचाई भासू लागली आहे. सपाट मैदानाच्या प्रदेशावर धुळींची वादळे उठू लागली आहेत. मोठ्या शहरांतून रासायनिक कारखान्यांमुळे हवा खराब होऊ लागली आहे. पण रशियात मोटारींचा सुळसुळाट अमेरिकेइतका झालेला नाही. तेथील उद्योगधंद्यांचे केंद्रीकरणही अमेरिकेइतके झालेले नाही. लोकसंख्या अद्याप विरळ आहे. ह्या सर्व घडामोडींचा रशियातील राज्यकर्ते विचार करू लागले आहेत. वास्तविक अमेरिका आणि पश्चिम युरोपमधील औद्योगीकरणाचे उदाहरण डोळयापुढे असताना रशियन सरकारने ह्या आधीच उपाययोजना करण्यास पाहिजे होती. पण माणसाप्रमाणेच देशही दुसऱ्याच्या अनुभवाने शिकत नाहीत.

---

### " मध्यवर्ती मंत्र्यांना दरमहा ३७,००० रु. मिळतात " सामान्य माणसाच्या ८४८ पट उत्पन्न

" पंत प्रधान श्रीमती इंदिरा गांधी आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकारी ह्यांना दरसाल करपात्र ४·४८ लक्ष रुपयांची प्रचंड प्राप्ती होते. म्हणजे दरमहा ३७,००० रु. उत्पन्न झाले. सामान्य माणसाला दरमहा सरासरीने ४४ रु. मिळतात त्याच्या ८४८ पट उत्पन्न समाजवादी मंत्र्यांनी घेणे कितपत रास्त आहे ? शहरी मालमत्ता व उत्पन्न ह्यांवर मर्यादा घालण्याची भाषा बोलणारे स्वतःच्या उत्पन्नावर आणि अनुषंगिक फायद्यांवर मर्यादा घालण्याची मात्र भाषा बोलीत नाहीत. सामान्य माणसाच्या उत्पन्नास कर माफ नाही, मग मंत्र्यांचे उत्पन्न तेवढे करमाफ का असावे ? " :— स्वतंत्र पक्षाचे जनरल सेक्रेटरी, डॉ. आर. सी. कूपर.

---


## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १४,६२,२०,००० |
| ठेवी | रु. | ७४,५७,३६,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,४२,०९,१२,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

तारेचा पत्ता : " मॉर्गेज "
दूरध्वनी : मुख्य कार्यालय २६७८०१/२/३
कार्यकारी संचालक २६१४९७

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६९ अखेर बँकेचे भागभांडवल ६ कोटी ६६ लाख, गंगाजळी ४५ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक २८ कोटी व येणे कर्ज ८५ कोटी आहे.

वी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

### टेलिफोनवर बोलणाऱ्यांचे चित्र

अमेरिकेतील बेल टेलिफोन कंपनीने टेलिफोन करताना दुसऱ्या टोकाशी असणारा माणूस दाखविणारा टेलिफोन तयार केला आहे. पिटसबर्ग शहरात अशा २३ टेलिफोन्सचे दळणवळण चालू करण्यात येणार आहे. अशा प्रकारचा टेलिफोन बनविण्याचे कंपनीचे प्रयत्न गेली वीस वर्षे चालू होते. १९७५ च्या सुमारास अशा प्रकारचे १ लाख टेलिफोन्स बसविण्यात येतील. त्यामुळे २४ शहरांतील लोकांना नव्या टेलिफोन्सवरून एकमेकांशी बोलता येईल. ज्या कचेऱ्यांतून अगर घरांतून नवे टेलिफोन्स बसविण्यात येतील त्यांना दरमहा १६० डॉलर्स अथवा १,२०० रुपये आकार द्यावा लागेल. ह्या आकारात त्यांना ३० मिनिटांपर्यंत टेलिफोन वापरता येईल. तीस मिनिटांनंतर प्रत्येक मिनिटाला २५ सेंटस् द्यावे लागतील. नवे टेलिफोन्स व्यापक प्रमाणावर वापरात येणे १९८० पर्यंत तरी शक्य नाही. कारण त्याचा खर्च मोठा आहे.

---

### टोरोंटो शहरात हिंदी चित्रवाणी

टोरोंटो शहरात गेल्या महिन्याच्या प्रारंभापासून चित्रवाणीवरून हिंदी कार्यक्रम प्रक्षेपण करण्यात येऊ लागला आहे. ७ जूनला सादर करण्यात आलेल्या पहिल्या कार्यक्रमात गालिब ह्यांची काही गझले, फिल्मी आणि वाद्य संगीत ऐकविण्यात आले. हा कार्यक्रम सुरू करण्याचे श्रेय श्री. वीरेंद्र अढिआ ह्यांना आहे. ते टोरोंटो येथे एक भारतीय वार्तापत्रही काढीत असतात. त्याशिवाय दर शनिवारी संगीत भारती ह्या नावाने संगीताचा कार्यक्रमही प्रक्षेपित करीत असतात. टोरोंटो शहरात सध्या सुमारे २० हजार हिंदी लोक आहेत. ह्या लोकांसाठी हिंदी संस्कृतीचे एक केंद्र स्थापन करण्याचाही त्यांचा विचार आहे. केंद्रासाठी एक जुने मोडकळीस आलेले चर्च विकत घेण्याच्या खटपटीत ते आहेत. त्या ठिकाणी एक उपहारगृहही काढण्यात येणार आहे.

---

### घाणीच्या दृष्टीने (वासाने?) शहरांचा अनुक्रम

"एखादा परदेशी प्रवासी भारतात येतो, तेव्हा त्याला भारतातील दारिद्र्याची आधीच कल्पना असते, पण घाणीबद्दल त्याला कल्पना नसते. पहिल्या प्रथम त्याने तो बेजार होतो. दोन-तीन आठवड्यांनी फारच घाण वास वगळून बाकीच्या दुर्गंधीची त्याला सवय होऊन जाते. येथे जो २० वर्षे राहील, त्याची घाणीबद्दलची कल्पनाच बदलून जाईल. त्याला घाण दिसणारच नाही. माझ्या अनुभवाप्रमाणे, सर्वांत घाण शहरांचा अनुक्रम असा आहे. लोकांच्या कल्पनेप्रमाणे बनारस हे सर्वांत घाण शहर नाही.

"१ आग्रा २ मुंबई ३ कलकत्ता ४ बनारस ५ जयपूर ६ हैद्राबाद ७ नवी दिल्ली"

— मरे बेल ह्या ऑस्ट्रेलियन प्रवाशाच्या टिपणावरून (इंप्रिंट फेब्रुवारी १९७०).

---

**ताडीचे एअर कंडिशण्ड दुकान**—प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी कोचीन येथे एक एअर कंडिशण्ड ताडीचे दुकान सुरू करण्यात आले आहे.

**फोनवरून विवाह**—इरशद अली ह्या इंग्लंडमधील एका मुसलमान आजोबाने १५ जून रोजी पूर्व पाकिस्तानातील सिल्हेट येथील एका तरुणीशी पाच मिनिटांचा फोन कॉल करून विवाह विधी पुरा केला. अलीने ह्या तरुणीला पूर्वी समक्ष पाहिलेले नाही. ती आता पतीकडे, इंग्लंडमध्ये, रवाइक होण्यास जाईल.

**लोकसंख्येत १२ कोटींची भर**—जून, १९७१ मध्ये भारताची लोकसंख्या ५६·४२ कोटी, म्हणजे १९६१ च्या मानाने १२·१५ कोटी जास्त होईल असा अंदाज आहे.

**नेपाळच्या राजपुत्राचा विवाहखर्च**—नेपाळचे युवराज विरेंद्र ह्यांचा तीन महिन्यांपूर्वी विवाह साजरा झाला, त्यावर नेपाळ सरकारने २० लक्ष रु. खर्च केले. त्यापैकी ११ लक्ष रु. परदेशी बड्या पाहुण्यांच्या पाहुणचारावर खर्च झाले.

**रेल्वेजचे जाहिरातींपासून उत्पन्न**—हिंदी रेल्वेजना १९६९-७० मध्ये रेल्वे स्टेशनांवरील डब्यांतील व डब्यांबाहेरील आणि इतर मार्गांच्या जाहिरातींपासून ७५·३९ लक्ष रु. उत्पन्न मिळाले. गेल्या वर्षीपेक्षा हे उत्पन्न ११ लक्ष रु. नी अधिक आहे.

**सुटीच्या दिवशी तुरुंगवास**— गुन्हा करण्याची पहिलीच वेळ असणारांना शिक्षा करताना शिक्षा भोगण्याची सवलत देण्याचे न्यू साउथ वेल्सच्या राज्य मंत्रिमंडळाने ठरविले आहे. सुटीच्या दिवशी तुरुंगवास भोगून त्यांना सोमवारी कामावर रुजू होता येईल. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांचे आर्थिक नुकसान होणार नाही.

**मराठीमध्ये टेलिफोन डिरेक्टरी**—बडोद्याच्या इंडियन एक्सपोर्ट ट्रेड जर्नलला मराठी टेलिफोन डिरेक्टरी प्रसिद्ध करण्यासाठी पोस्ट आणि तार खात्याने लायसेन्स दिला आहे. हिंदीखेरीज प्रादेशिक भाषांपैकी फक्त गुजरातीमध्येच डिरेक्टरी प्रसिद्ध झालेली आहे. बिहार, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि दिल्ली ह्या विभागांसाठी खात्यानेच हिंदी डिरेक्टरीज् काढल्या आहेत; मुंबई, हैद्राबाद, पंजाब विभागांसाठीही प्रसिद्ध होतील. प्रादेशिक भाषात डिरेक्टरी प्रसिद्ध करू इच्छिणाऱ्यांनी पोस्ट आणि तार खात्यास रॉयल्टी दिली पाहिजे, असे सरकारी धोरण आहे.

**अस्तित्वात नसलेल्यांना कर्जे**—कुन्नूर येथील इंडियन बँकेच्या माजी एजंटाने कर्जे देताना लक्षावधी रुपयांची अफरातफर केल्याचे सेंट्रल ब्यूरो ऑफ इनव्हेस्टिगेशनने उघडकीस आणले आहे. कर्ज मुक्त हस्ताने देण्याच्या धोरणाचा फायदा घेऊन ह्या एजंटाने अस्तित्वात नसलेल्या लोकांना कर्जे दिली होती.

---

## रत्नाकर बँकेचे नवे चेअरमन व चीफ एक्झि. ऑफिसर
## श्री. वा. ना. गरगटे

कोल्हापूर येथील दि रत्नाकर बँक लिमिटेड या संस्थेचे चेअरमन व चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणून संस्थेच्या संचालक मंडळाच्या प्रेरणेने व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई यांच्या मान्यतेने श्री. वा. ना. गरगटे ह्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर पदावर ते नुकतेच रुजू झाले आहेत. नवीन बँकिंग रेग्युलेशन अॅक्टप्रमाणे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मान्यतेनुसार चेअरमन व चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर नेमावे लागतात.


श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि. या संस्थेमध्ये श्री. गरगटे ह्यांनी संस्थेच्या सुरवातीपासून एक तप इतका काल काम केले. त्यांपैकी आठ वर्षे सदर संस्थेच्या मॅनेजिंग डायरेक्टर पदावर ते होते. त्यानंतर माहे आक्टोबर, १९६९ मध्ये सदर संस्थेच्या व संचालकांच्या सद्भावना व सदिच्छा पाठीशी घेऊन ते सेवानिवृत्त झाले आणि आता ते पुनः रत्नाकर बँकेची धुरा वाहण्यास आले आहेत.

सन १९३७ ते १९४३ अखेर आपल्या करिअरच्या सुरुवातीपासून कोल्हापूर येथील श्री महावीर को-ऑप. बँक लि. या संस्थेचे पहिले मॅनेजर म्हणून त्यांनी काम केले व तदनंतर सन १९४३ मध्ये रत्नाकर बँकेच्या स्थापनेच्या कार्यात भाग घेऊन पहिली पाच वर्षे या बँकेचे मॅनेजर म्हणून त्यांचा या संस्थेशी संबंध आला. आता २२ वर्षांचा कालावधी लोटल्यानंतर या संस्थेशी त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांचा पुनः संबंध येत आहे हा विशष योगायोग आहे.

रत्नाकर बँक ही शेड्युल्ड व लायसेन्सड म्हणून मान्य केलेली बँक आहे. बँकेचे शेअर भांडवल व रिझर्व फंड १० लाख रुपये असून पावणे दोन कोटींचे खेळते भांडवल झाले आहे. शाहुपुरी-कोल्हापूर या ठिकाणी बँकेने स्वतःची भव्य इमारत उभारली आहे. कोल्हापुर-शाहुपुरी, सांगली, जयसिंगपूर, मिरज, पेठ–वडगाव व हुपरी अशा ठिकाणी शाखा आहेत. येत्या एक-दोन महिन्यांत इचलकरंजी व रुकडी या ठिकाणी नवीन शाखा उघडण्यात येत आहेत.

सहकारी व व्यापारी बँका व सहकारी कारखानदारी अशा क्षेत्रांत काम व सेवा करण्याचे श्री. गरगटे ह्यांना सुभाग्य लाभले. त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा आणि कार्यक्षमतेचा फायदा रत्नाकर बँकेच्या कार्याला खूपच उपकारक ठरेल अशी आमची खात्री आहे.

**मुले होऊ देण्यासाठी परवाना** –– लंडन येथील धार्मिक प्रवचनात बोलताना एका अमेरिकन धर्मगुरूने अशी सूचना केली आहे की विवाहित जोडप्यांना त्यांच्या बौद्धिक पात्रतेप्रमाणे मुले होऊ देण्यासाठी परवानापद्धती अमलात आणावी. सामान्य जोडप्यांना दोन, कनिष्ठ प्रतीच्या जोडप्यांना एक आणि बुद्धिमान जोडप्यांना तीन ते चारपर्यंत मुले होऊ देण्याचे परवाने देण्यात यावेत; नाहीतर उपासमार अटळ आहे.




# THE BELGAUM BANK LIMITED

**Estd. 1930**


SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659–60, Raviwar Peth, Belgaum


**Share Capital : Rs. Over 8 Lakhs**
**Reserves : Rs. Over 8½ Lakhs**
**Deposits : Rs. 5·Crores & 75 Lakhs**


39 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

S. Y. KAMAT — *General Manager.*
K. B. KIRTIKAR — *Chairman.*




**GADRE BROTHERS**
**ENGINEERS & FOUNDERS**
**MADHAVNAGAR (S. Rly.)**
Phone : 318 Sangli
Gram : 'SEWA Madhavnagar





इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग–सांगली (महाराष्ट्र)

फोन : २३२ तार : Vijayplow



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.११५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)